संपूर्ण माणदेशात एकाचवेळी प्रसिध्द होणारे एकमेव दैनिक

mandeshexpressatp@gmail.com

दैनिक माणदेशी बुलंद आवाज..

# माणदेश एक्सप्रेस

संपादक : दिपक गौतम प्रक्षाळे

मोबा. ९५९५०४७६७६/९५०३६३८६८६

www.mandeshexpress.com




● वर्ष : ७ वे ● ● अंक : ६५ वा ● ● मंगळवार दि. ३ ऑक्टोबर २०२३ ● ● किंमत २ रु ● पाने : ४ ● RNI : MAHMAR/2017/77021 Postl Reg : SGL/143/2023-2025

# २४ तासांत २४ जणांचा मृत्यू

## नांदेडच्या सरकारी रुग्णालयातील खळबळजनक प्रकार

**माणदेश एक्सप्रेस न्युज**

**नांदेड :** नांदेड जिल्ह्यातील सरकारी रुग्णालयात मागील २४ तासांत २४ जणांचा मृत्यू झाला आहे. यामध्ये १२ नवजात बालकांचाही समावेश आहे. अवघ्या २४ तासांत २४ जणांचा मृत्यू झाल्याने संपूर्ण जिल्ह्यात खळबळ उडाली आहे. शंकरराव चव्हाण शासकीय महाविद्यालय आणि रुग्णालयात हा धक्कादायक प्रकार घडला आहे. याप्रकरणी राष्ट्रवादीचे प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील यांनी सरकारला धारेवर धरत सरकारच्या अकार्यक्षमतेवर प्रश्न उपस्थित केले आहेत. औषधांच्या कमतरतेमुळे हे मृत्यू झाल्याचे शंकरराव चव्हाण शासकीय रुग्णालयातील अधिकाऱ्यांनी सोमवारी सांगितले. रुग्णालयाच्या




डीनने सांगितलं की, मृतांमध्ये १२ नवजात मुले होती. यामध्ये सहा मुली आणि सहा मुलांचा समावेश आहे. तर इतर बारा लोकांचा मृत्यू सर्पदंशासह विविध गंभीर आजारांमुळे झाला. रुग्णालयाच्या डीनने पुढे सांगितलं, हे तीन स्तरीय सुविधा असणारे रुग्णलय आहे. परंतु जिल्ह्यातील वेगवेगळ्या भागातील रुग्ण येथे येतात. कारण ७० ते ८० किमीच्या परिघात हे एकमेव आरोग्य सेवा केंद्र आहे. रुग्णालयामध्ये दाखल होणाऱ्या रुग्णांची संख्या काही वेळा संस्थेच्या बजेटपेक्षा जास्त असते आणि त्यामुळेच रुग्णालयात औषधांचा तुटवडा निर्माण झाला, असेही ते म्हणाले. हॉस्पिटल हाफकिन नावाच्या संस्थेकडून औषधे खरेदी करणार होते. परंतु तसे झाले नाही. रुग्णांना स्थानिक स्टोअरमधून औषधे विकत घेऊन उपचार करण्यात आले, अशी माहिती शंकरराव चव्हाण शासकीय रुग्णालयाच्या डीनने दिली.

तर या घटनेवर राष्ट्रवादीचे प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील म्हणाले, नांदेड शहरातील शासकीय रुग्णालयात चोवीस तासात तब्बल २४ जणांचा मृत्यू झाल्याची धक्कादायक बाब समोर येत आहे. त्यात १२ नवजात बालकांचा समावेश आहे. ठाण्यातील छत्रपती शिवाजी महाराज रुग्णालयात घडलेल्या दुर्दैवी प्रकारानंतर नांदेडहून येणारी बातमी वेदनादायी आहे. रुग्णालयात औषधांचा तुटवडा निर्माण झाला. रुग्णांना वेळेवर औषधे पुरवठा होऊ शकला नाही त्यामुळे त्यांना जीव गमवावा लागला अशी प्राथमिक माहिती मिळते आहे.

जितकी कार्यक्षमता स्वतःच्या प्रचारासाठी, विरोधी पक्ष फोडण्यासाठी वापरता, तितकी कार्यक्षमता जर कामाप्रती दाखवली असती तर ही परिस्थिती आली नसती. सरकारच्या अकार्यक्षमतेमुळे आज अनेक आयांनी आपली लेकरे गमावली आहेत. त्यांच्या अश्रूंची किंमत सरकारला मोजावी लागेल.

## रोहित पाटलांची प्रकृती खालावली




सांगली : टेंभू योजनेमध्ये मध्ये वंचित गावांचा समावेश व्हावा यासाठी उपोषणाला बसलेले रोहित पाटील

**माणदेश एक्सप्रेस न्युज**

**सांगली :** पाण्यापासून वंचित १९ गावांसाठी टेंभू योजनेच्या विस्तारीत योजनेसाठी प्रशासकीय मान्यता मिळावी या मागणीसाठी बेमुदत उपोषण करणारे स्व. आरआर आबांचे चिरंजीव राष्ट्रवादी काँग्रेसचे युवा नेते रोहित पाटील यांची पहिल्याच दिवशी प्रकृर्ती खालावली. वैद्यकीय तपासणीमध्ये त्यांना १०२ फॅरनहेट ताप असल्याचे दिसून आले.

आमदार सुमनताई पाटील व पुत्र रोहित पाटील यांनी सोमवारपासून जिल्हाधिकारी कार्यालयासमोर बेमुदत उपोषण सुरु केले आहे. दुपारनंतर त्यांना अस्वस्थ वाटू लागल्याने जिल्हा शासकीय रुग्णालयाच्या वैद्यकीय पथकाने तपासणी केरली असता ताप असल्याचे स्पष्ट झाले. कालपासूनच रोहितची प्रकृर्ती ठीक नव्हती. सकाळी डॉक्टरांच्याकडून उपचारही करुन घेतले. तथापि, विश्रांती न घेता उपोषण आंदोलनात आई आमदार श्रीमती पाटील यांच्यासोबत सहभागी झाले आहेत.

## श्रेया झांबरे हिचा शिवाजी विद्यापीठाच्या जिल्हास्तरीय युवा महोत्सवात सहभाग

**माणदेश एक्सप्रेस न्युज**

**कोल्हापूर :** कु. श्रेया सुभाष झांबरे रा. नेलकरंजी ही विद्यार्थिनी शिवाजी विद्यापीठ कोल्हापूर या ठिकाणी पदवीत्तर पदवी वनस्पतीशास्त्र विभागामध्ये प्रथम वर्षात शिकत आहे. शिवाजी विद्यापीठाचा ४३ वा जिल्हास्तरीय युवा महोत्सव सदाशिवराव मंडलिक महाविद्यालय मुरगुड याठिकाणी दि.०१ ऑक्टोंबर २०२३ रोजी संपन्न झाला. यामध्ये श्रेया झांबरे हिने पथनाट्य, वादविवाद, प्रश्नमंजुषा, वक्तृत्व या कला प्रकारामध्ये सहभाग घेतला. यासाठी तिला वनस्पतीशास्त्र विभागाचे प्रमुख प्रा.आर.व्ही. गुरव सर, युवा महोत्सव प्रमुख प्रा.दिपक भादले सर व प्रा.अजय शिंदे सरांचे मोलाचे मार्गदर्शन लाभले.



कोल्हापूर : मुरगूड येथील युवा महोत्सव मधील पथनाट्यात सहभागी झालेली कु. श्रेया झांबरे

## सोहमच्या शिक्षणासाठी ऑफ्रोट फाऊंडेशनकडून ५० हजारांची मदत

**माणदेश एक्सप्रेस न्युज**

**चंद्रपूर :** पोलीस अधीक्षक रवींद्रसिंग परदेशी यांच्यासोबत झालेल्या संवादाच्या चित्रफितीमुळे राज्यात लोकप्रिय झालेल्या पोंभूर्णा तालुक्यातील डोंगर हळदी येथील ध्येयवेडा सोहम उईके याची ऑफ्रोट फाऊंडेशन दखल घेतली असून त्याच्या पुढील शिक्षणासाठी ५० हजार रुपयांची मुदत ठेव करण्यात आली आहे.

पोलीस अधीक्षक आणि मुख्य कार्यकारी अधिकारी विवेक जॉन्सन यांनी सोहमला कार्यालयात बोलावून त्याचा सत्कार केला होता. सोहम जि.प. प्राथमिक शाळेत ८ व्या वर्गात शिकत असून त्याच्या घरची परिस्थिती अत्यंत हलाखीची आहे. आत्मविश्वास, जिद्द, चिकाटी आणि एखाद्या गोष्टीची ओढ या बळावर आपण कुठल्याही परिस्थितीवर मात करू शकतो. खरी संपती धन नसून ज्ञान आहे व ती शिक्षणामुळेच मिळवू शकतो, हा दृढ आत्मविश्वास शिक्षणासाठी संघर्ष करणाऱ्या समाजातील युवकांसाठी प्रेरणादायी व मार्गदर्शक आहे.

ध्येयवेड्या सोहमच्या शिक्षणासाठी आर्थिक अडचण येऊ नये याकरिता ऑफ्रोट फाऊंडेशनचे संचालक ड. राजेंद्र मरसकोल्हे, नंदकिशोर कोडापे यांच्या मार्गदर्शनाखाली सोहन याच्या पुढील शिक्षणाकरिता पन्नास हजाराची मदत करण्याचा निर्णय घेतला आहे. जिल्हाध्यक्ष विजय कुमरे, सचिव शंकर मडावी, सुनील गेडाम, पुरुषोत्तम सिडाम यांच्या हस्ते सोहम व त्याच्या पालकांकडे २५ हजाराचा धनादेश सुपूर्द करण्यात आला. दुसरा धनादेश वर्ग १० वीचे शिक्षण पूर्ण झाल्यानंतर देण्यात येणार आहे.




## अवैध वाळू वाहतुक करणारा ट्रॅक्टर जप्त

**माणदेश एक्सप्रेस न्युज**

**जत :** पांढरेवाडी (ता. जत) येथे नदीपात्रातून अवैद्यरित्या वाळू उपसा करणाऱ्या ट्रॅक्टर चालकावर कारवाई करत ट्रॅक्टरसह वाळू असा ५ लाख १० हजार किमतीचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. ही कारवाई शनिवारी (दि. ३०) उमदी पोलिसांनी केली आहे. याप्रकरणी मल्हारी करपे, प्रकाश करपे (दोघे रा. पांढरेवाडी) व सुरेश कोळी, रा. संख असे तिघा जणावर गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

याबाबत अधिक माहिती अशी, उमदी पोलीस ठाणे हद्दीतील संख दुरुक्षेत्र कार्यक्षेत्रात असलेल्या पांढरेवाडी येथील नदीपात्रातून अवैधरित्या चोरीने वाळू उपसा करत असल्याची माहिती सहाय्यक पोलीस निरीक्षक संदीप शिंदे यांना मिळाली होती. त्यांनी या ठिकाणी छापा टाकून एक ट्रॅक्टर, एक ट्रॉली व वाळू असा एकूण ५ लाख १० हजार रुपये किमतीचा मुद्देमाल जप्त केला आहे. ही कारवाई सहाय्यक पोलीस निरीक्षक संदीप शिंदे , पोहेका कपील काळेल,आप्पासाहेब हाक्के, पो.का चौगूले, पोका सुदर्शन खोत यांनी केली आहे. अधिक तपास उमदी पोलीस करत आहेत.



उमदी : येथे जप्त करण्यात आलेल्या वाळू वाहनासह तपास करणारे पोलीस अधिकारी व कर्मचारी

## तुम्ही जर प्रयत्न केले असते तर, आम्हाला उपोषणाला बसण्याची वेळ आली नसती : रोहित पाटील

**माणदेश एक्सप्रेस न्युज**

**तासगाव :** पाण्यासाठी आम्ही जे काही प्रयत्न केले ते लोकांनी उघड्या डोळ्यांनी बघितले आहे. त्यांनी जर प्रयत्न केले असते तर आम्हाला आमरण उपोषण करायची वेळ आली नसती. त्यांनी प्रयत्न केले नाहीत म्हणूनच हा निर्णय घ्यावा लागतोय असे म्हणत रोहित पाटील यांनी खास. संजयकाका पाटील यांच्यावर जोरदार टीका केली.



रोहित पाटील

आमदार सुमनताई पाटील या पुत्र प्रेमासाठी, मुलाच्या राजकीय भवितव्यासाठी राजकीय नौटंकी करत असल्याची टीका केली होती, त्याला रोहीत पाटील यांनी जोरदार प्रत्युत्तरदिले. सांगली जिल्ह्यातील तासगाव आणि कवठे महांकाळ तालुक्यातील प्रत्येकी नऊ गावातील शेतकऱ्यांना टेंभूचे पाणी मिळावे अशी मागणी राष्ट्रवादीच्या आमदार सुमनताई आर आर पाटील यांनी केलीय. या मागणीसाठी आमदार सुमनताई यांनी २ ऑक्टोबरपासून जिल्हाधिकारी कार्यालयासमोर बेमुदत उपोषणाचा इशारा दिलाय. मुलगा आणि राष्ट्रवादीचे युवा नेते रोहित पाटील यांच्यासह हे आंदोलन करणार असे सुमनताई पाटील यांनी जाहीर केले असून याबाबत त्यांनी जिल्हाधिकाऱ्यांनाही निवेदन दिले आहे.

## दिघंची सोसायटीची वार्षिक सभा संपन्न

**माणदेश एक्सप्रेस न्युज**

**दिघंची :** आटपाडी तालुक्यातील दिघंची येथील दिघंची विकास सोसायटीची वार्षिक सभा मोठ्या उत्साहाने संपन्न झाली. अध्यक्षस्थानी संस्थेचे चेअरमन हणमंतराव धोंडीसाहेब देशमुख होते. प्रारंभी लोकनेते स्व.धोंडीसाहेब बापूसाहेब देशमुख यांच्या प्रतिमेचे पूजन करुन सभेची सुरवात करण्यात आली. सोसायटीचे सचिव दादासाहेब काळे यांनी अहवाल वाचन केले.

वार्षिक सभेमध्ये अनेक विषयावरती सविस्तर चर्चा करण्यात आली. सभेमध्ये लोकोपयोगी व सामाजिक उपक्रम मोठ्या प्रमाणामध्ये राबवण्याचे ठरले. तसेच यावर्षी सभासदांना डिव्हीडंट १५% टक्के जाहीर करण्यात आला. संस्थेचे सभासद शंकरराव माळी यांनी संस्थेचे चेअरमन हणमंतराव देशमुख व व्हा. चेअरमन सुभाष मोरे व सर्व संचालकांच्या अभिनंदनचा ठराव मांडला. संस्थेची वार्षिक सर्वसाधारण सभा उत्साहात पार पडली. आभार सुभाष मोरे यांनी आभार मानले.



दिघंची : दिघंची विकास सोसायटीच्या वार्षिक सभेला उपस्थित चेअरमन, व्हा.चेअरमन, संचालक व उपस्थित मान्यवर

## आटपाडी बाजार परिसरात स्वच्छता मोहीम

**माणदेश एक्सप्रेस न्युज**

**आटपाडी/प्रतिनिधी :** 'एक तारीख एक तास' या मोहिमे अंतर्गत आटपाडी शहरामध्ये नगरपंचायतीच्या वतीने विविध ठिकाणी स्वच्छता मोहीम राबविण्यात आले. बाजार पटांगण येथे राबविण्यात आलेल्या स्वच्छता मोहिमेमध्ये आटपाडी ग्रामपंचायतीचे माजी सदस्य दतात्रय पाटील (पंच), युवा नेते मनोज नांगरे यांनी सहभाग घेत कर्मचारी वर्गाचा उत्साह वाढविला.

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी वर्षभरापूर्वी आपल्या राज्यात स्वच्छ महाराष्ट्र नागरी अभियान-२ चा शुभारंभ केला. संत गाडगेबाबांनी हाती झाडू घेऊन स्वच्छतेचे धडे दिले आहेत. आता या धड्यांची आपल्याला उजळणी करायची आहे. आपआपल्या परिसरात महापालिका, नगरपालिका, नगरपंचायत तसेच गावा-गावांमध्ये ग्रामपंचायतींच्या पुढाकारांनी स्वच्छता मोहिम राबवत, साचलेला कचरा, राडा-रोडा-डेब्रीज या मोहिमे अंर्तगत ही स्वच्छता मोहीम राबविण्यात आली.

स्वच्छता पंधरवडा-स्वच्छता ही सेवा या अभियानांतर्गत राष्ट्रपिता महात्मा गांधी यांच्या जयंतीच्या एक दिवस अगोदर म्हणजे दिवशी रविवारी १ ऑक्टोबर रोजी राज्यात सर्वत्र नागरी तसेच ग्रामीण भागात एक तारीख एक तास या उपक्रमांतर्गत आटपाडी शहरातील बाजार पटांगण, आटपाडी पंचायत समिती, पोलीस ठाणे, तहसीलदार कार्यालय, आटपाडी बस स्थानक या प्रमुख ठिकाणी नगरपंचायतीच्या कर्मचारी यांनी स्वच्छता मोहीम राबवली.



आटपाडी : येथे नगरपंचायतीच्या वतीने राबविण्यात आलेल्या स्वच्छता मोहिमेमध्ये दत्तात्रय पाटील (पंच), मनोज नांगरे यांनी सहभाग घेत स्वच्छता मोहीम राबविली.




## दिघंचीत आम. गोपीचंद पडळकर यांचा वाढदिवस साजरा

**माणदेश एक्सप्रेस न्युज**

**दिघंची/वार्ताहर :** आटपाडी तालुक्यातील दिघंची येथे बहुजन हृदय सम्राट आम. गोपीचंद पडळकर यांचा वाढदिवस साजरा करण्यात आला. यावेळी भारतीय जनता पार्टी तालुकाध्यक्ष जयवंत सरगर, मार्केट कमिटी संचालक आबासो पुजारी, उपसरपंच विष्णू यादव मा. जि.प. सदस्य मोहन रणदिवे, सरपंच अमोल मोरे, भारतीय जनता पार्टी युवा मोर्चा तालुका अध्यक्ष प्रणव गुरव, भाजपा युवा नेते प्रशांत भाळवणकर, भाजपा युवा नेते शेखर रणदिवे, जनसेवा संघटना जिल्हाध्यक्ष नवनाथ रणदिवे, अशोक पवार, भारतीय जनता पार्टी जिल्हा कार्यकारणी सदस्य माजी ग्रामपंचायत सदस्य शाहीर जयवंत रणदिवे, महेश अण्णा साळी, युवा नेते बंडू दडस, सरपंच मिलिंद बनसोडे, लिंगीवरे गावचे युवा नेते तानाजी खटके, भैयासाहेब पाटील, निलेश धोत्रे, ,लखन तुपे, राजू रणदिवे,राहुल रणदिवे,सुजित रणदिवे.सागर रणदिवे, पांडुरंग कावरे, शरद रणदिवे, तसेच सर्व ग्रामस्थ उपस्थित होते.



दिघंची : येथे आम.गोपीचंद पडळकर यांचा वाढदिवस निमित्त सत्कार करताना उपस्थित मान्यवर

# संपादकिय

## साने गुरुजींच्या अमळनेरमध्ये नथुराम गोडसेचा जयघोष!

बलसागर भारत होवो। विश्वात शोभुनी राहो ! राष्ट्रार्थ प्राण हे उरले। मी सिद्ध मराया हो !! असे म्हणणाऱ्या साने गुरुजी अर्थात पांडुरंग सदाशिव साने यांच्या अमळनेर येथे गणपती विसर्जन मिरवणुकीमध्ये नथुराम गोडसेचा जयघोष करण्यात आल्याने कट्टरपंथीयांची वाटचाल कुणीकडे चालली आहे हे सिद्ध होत असून हे सारे पोलिसांच्या डोळ्यादेखत घडल्याने याचे आश्चर्य वाटत असले तरी, सरकार याला पाठबळ तरी देत नाही ना? अशी शक्यता बळावली आहे.

पांडुरंग सदाशिव साने हे एक मराठी लेखक, शिक्षक, सामाजिक कार्यकर्ते आणि महाराष्ट्र, भारत येथील स्वातंत्र्यसेनानी होते. त्यांना विद्यार्थी व अनुयायी साने गुरुजी म्हणून ओळखत असे. त्यांना भारताचे राष्ट्रीय शिक्षक म्हणून संबोधले जाते. श्यामची आई ही सुप्रसिद्ध कादंबरी त्यांनी नाशिकमधील तुरुंगात असतानाच लिहिली. ते उत्तम कवी होते, त्यांच्या कवितांचा प्रभाव लोकांमध्ये इतका वाढला कि, ब्रिटिश सरकारने त्यावर बंदी घालून जप्ती केली. समाजातील जातिभेद, दलित लोकांना मिळणारी वागणूक, अस्पृश्यता या सारख्या अनेक रूढी व परंपराना साने गुरुजी यांनी कडाडून विरोध केला.

परंतु नेमके याचे उलटे झाले असून अमळनेर शहरात गणेश विसर्जन मिरवणुकीत महात्मा गांधी यांच्या हत्येतील दोषी नथुराम गोडसे याच्यासह संभाजी भिडे यांच्या प्रतिमा नाचवित जयघोष करण्यात आल्याचा धक्कादायक घडला. नथुराम गोडसे याच्या प्रतिमेसह शिवप्रतिष्ठान हिदुस्थानचे संस्थापक संभाजी भिडे यांचीदेखील प्रतिमा नाचवत जयघोष करतानाचा व्हिडिओ सोशल मीडियावर चांगलाच व्हायरल झाला आहे. या व्हिडिओमुळे जळगाव जिल्ह्याचा संपूर्ण राज्यात मोठी खळबळ उडाली आहे.

जळगाव जिल्ह्यात अमळनेर शहरात सार्वजनिक गणेश मंडळांच्या विसर्जन मिरवणुकीला प्रारंभ झाला. रात्री साडे अकरा वाजेच्या सुमारास शहराच्या पान खिडकी परिसरातील जय बजरंग गणेश मंडळाची मिरवणूक निघाली. शहराच्या मध्यवर्ती भागातून मिरवणूक जात असताना मिरवणुकीत काही कार्यकर्ते आले. यावेळी संबंधित प्रकार घडला.या कार्यकर्त्यांनी हातात महात्मा गांधी यांच्यावर गोळ्या झाडणाऱ्या नथुराम गोडसे याची प्रतिमा धरलेल्या होत्या. तर एका बाजूला गोडसे तर दुसऱ्या बाजुला संभाजी भिडे याची प्रतिमा होती. यासोबत पंतप्रधान नरेंद्र मोदी, उत्तर प्रदेशचे मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ आणि बागेश्वर धामचे पंडित धिरेंद्र कृष्ण शास्त्री यांच्या देखील प्रतिमा नाचविण्यात आल्या.

ज्येष्ठ गांधीवादी नेते आणि स्वातंत्र्य सेनानी साने गुरूजी यांची कर्मभूमी असलेल्या अमळनेर शहरात हा प्रकार घडल्यामुळे संपूर्ण राज्यात खळबळ उडाली आहे. दरम्यान, डीजेच्या तालावर कार्यकर्ते नथुराम आणि भिडे यांच्या प्रतिमा नाचवित होते त्यावेळी पोलिसांनी बघ्याची भूमिका घेतल्याची माहिती समोर आली आहे. नथुराम गोडसे याने महात्मा गांधी यांची हत्या केली. ज्येष्ठ गांधीवादी नेते आणि स्वातंत्र्य सेनानी साने गुरूजी यांची कर्मभूमी असलेल्या अमळनेर शहरात सदरचा प्रकार घडल्याने एक प्रकारे साने गुरुजी यांचे महत्व कमी करण्याचे हे प्रयत्न कट्टरपंथीयाकडून केले जात तर नाहीत ना? असा सवाल उपस्थित होत आहे.

## कृष्णा प्रकल्पाच्या फेरजल नियोजनास मंजूरी : फडणवीस

**माणदेश एक्सप्रेस न्युज**

**मुंबई :** सातारा जिल्ह्यातील कृष्णा प्रकल्पाच्या फेरजल नियोजनास मुख्यमंत्री एकनाथजी शिंदे यांनी मान्यता दिली असून, त्यासंबंधीचा शासन निर्णय जारी करण्यात आला असल्याची माहिती उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिली.

साताऱ्यातील दुष्काळप्रवण तसेच जे भाग पाण्यापासून संपूर्णपणे वंचित होते, त्या परिसराला यामुळे कृष्णा प्रकल्पाचे पाणी उलपब्ध होणार आहे. दोन टीएमसी अतिरिक्त पाणी उपलब्ध होणार असून मुख्यत्त्वे चार तालुक्यातील ९००० हेक्टरला यामुळे सिंचन मिळणार आहे. यात सातारा, कोरेगाव, माण आणि खटाव तालुक्यांचा समावेश आहे. स्व. लक्ष्मणराव इनामदार उपसा सिंचन योजना सुद्धा यामुळे लाभान्वित होणार आहे.

सातारा जिल्ह्यातील विशेषत: या तालुक्यांमधील शेतकऱ्यांचे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी अभिनंदन केले.




## वाघनखे खोटी आहेत हे आदित्य ठाकरेंनी सिद्ध करावे : आ.शिवेंद्रराजे

**माणदेश एक्सप्रेस न्युज**



आ. शिवेंद्रराजे

**सातारा :** आदित्य ठाकरेंनी वाघनख्यांबाबत उपस्थित केलेले प्रश्न हा राजकीय विषय आहे. त्यांच्याकडून मुद्दाम प्रश्नचिन्ह उपस्थित केले जात आहे. जर इंग्लंडहून आणण्यात येणारी वाघनखे ही खरी नाहीत तर आदित्य ठाकरे यांनी ही वाघनखे खोटी आहेत, हे सिद्ध करावे, असे आव्हान आ. शिवेंद्रराजे भोसले यांनी आदित्य ठाकरे यांना दिले.

मराठी माणसांची मते केंद्रबिंदू मानून हा वाद करण्याचा प्रकार सुरू आहे. या सर्व प्रकाराला राजकीय रंग देण्याचा प्रयत्न सुरू आहे. दि. १८ नोव्हेंबर रोजी सातार्यात या वाघनख्यांची वाजत-गाजत मिरवणूक काढण्यात येणार आहे. जिल्हावासियांनी या वाघनख्यांचे दर्शन घ्यावे, असे आवाहनही यावेळी आ.शिवेंद्रराजे यांनी केले.

आ. शिवेंद्रराजे म्हणाले, ती वाघनखे खरी आहेत व शिवाजी महाराजांनी ती वापरली का? ही गोष्ट आजच समोर आली आहे. छत्रपती शिवाजी महाराजांच्या पराक्रमाला कमी लेखण्याचे काम झाले आहे. शिवजयंतीच्या तारखा हाही त्यातीलच एक भाग आहे. राज्य व केंद्र सरकारच्या माध्यमातून हे सुरू आहे. अनेक वर्षांपासून भवानी तलवार व वाघनखे परत यावी, ही शिवभक्तांची मागणी आहे. ही मागणी आता लवकरच सत्यात उतरणार आहे. इंग्लंडमधील असणार्या संग्रहालयात लुटून नेलेल्या वस्तू कोणाकडून नेल्या हे तिथे लिहलेले नाही. यावरून वाद घालणे योग्य नाही, असेही शिवेंद्रराजे म्हणाले.

आ. शिवेंद्रराजे पुढे म्हणाले, वाघ नखे सातार्यात आणण्यासंदर्भात ना. सुधीर मनगुंटीवार यांच्याशी फोनवरून चर्चा झाली आहे. त्यांनी ही वाघनखे महाराष्ट्रात आणल्यानंतर सातार्यात आणण्याचा शब्द दिला आहे. सातारा ही स्वराज्याची थोरली गादी असून शिवपराक्रमाची साक्ष देणार्या वाघनखांची वाजत गाजत मिरवणूक निघावी. शक्ती व स्फूर्ती स्थान असणार्या सातार्यात त्याचे दर्शन घेता यावे यासाठी कार्यक्रम होणार आहे. येथे वाघनखांची पूजा व शिवाजी महाराजांच्या पुतळ्यास अभिषेक केला जाणार आहे. त्यानंतर ही वाघनखे संग्रहालयात किंवा सुरक्षित ठिकाणी ठेवली जाणार आहेत. जिल्हावासियांनी याचे दर्शन घ्यावे, असे आवाहनही आ. शिवेंद्रराजे यांनी यावेळी केले.

## संभाजी महाराज पुतळा उभारणीवरून इचलकरंजीत आमदार - माजी नगरसेवकात शाब्दिक चकमक

**माणदेश एक्सप्रेस न्युज**

**इचलकरंजी :** इचलकरंजी शहरात छत्रपती संभाजी महाराज यांचा पुतळा कॉ. के. एल. मलाबादे चौक येथे उभारण्याच्या मुद्द्यावरून रविवारी आमदार प्रकाश आवाडे आणि ताराराणी आघाडीचे नेते सागर चाळके यांच्यात जोरदार शाब्दिक चकमक उडाली. उपस्थित लोकप्रतिनिधी व पदाधिकाऱ्यांनी मध्यस्थी करत दोघांना शांत केले.

स्वच्छ भारत अभियान उपक्रमाअंतर्गत इचलकरंजीत प्रत्यक्ष श्रमदानाद्वारे कॉ. मलाबादे चौकात स्वच्छता मोहिमेचा शुभारंभ खासदार धैर्यशील माने, आमदार प्रकाश आवाडे, आयुक्त ओमप्रकाश दिवटे आणि माजी लोकप्रतिनिधींच्या प्रमुख उपस्थितीत करण्यात आला. इचलकरंजीत संभाजी महाराज यांचा पुतळा उभारण्याची मागणी अनेक वर्षांपासून केली जात आहे. आमदार आवाडे यांनी कॉ. मलाबादे चौकात पुतळा बसविण्यासाठीचा प्रस्ताव इचलकरंजी नगरपरिषदेने द्यावा असे सांगितले होते. तोच धागा पकडत आमदार आवाडे यांनी आज स्वच्छता कार्यक्रमात विषय उपस्थित केला. ते म्हणाले, शासन दरबारी पाठपुरावा करत पुतळा उभारणीस मी मंजुरी आणली आहे. आता महानगरपालिकेने प्रस्ताव द्यावा. शासन निधीतून कॉ. मलाबादे चौकात पुतळा उभारला जाईल, कोणाला विरोध करायचा त्यांनी करावा. माजी नगरसेवक सागर चाळके, सदा मलाबादे यांनी आक्षेप घेत छत्रपती संभाजी महाराज चौकात पुतळा उभारण्याचे ठरले असताना कॉ. मलाबादे चौकाचा अट्टाहास का, आजच्या कार्यक्रमात हा विषय काढण्याची गरज काय होती, असा सवाल केला. त्यावरून आमदार आवाडे व चाळके यांच्यात शाब्दिक वाद झाला. आवाडे आपल्या मतावर ठाम राहिल्याने वाद वाढत असल्याचे पाहून खासदार धैर्यशील माने व अन्य लोकप्रतिनिधींनी मध्यस्थी करत वाद संपुष्टात आणला.

# महात्मा गांधीजींना स्वच्छतेतून अभिवादन

## आटपाडीतील देशमुख महाविद्यालयाचा एन.सी.सी. विभागाचा उपक्रम

**माणदेश एक्सप्रेस न्युज**

**आटपाडी :** येथील श्रीमंत बाबासाहेब देशमुख महाविद्यालयात भारत सरकार व १६ महाराष्ट्र बटालियन एन.सी.सी. सांगली यांच्या आदेशानुसार स्वच्छ भारत अभियान अंतर्गत 'स्वच्छता ही सेवा' या उपक्रमामध्ये भारताचे राष्ट्रपिता महात्मा गांधीजी यांच्या जयंती निमित्त महाविद्यालयातील एन.सी.सी. विभागाच्यावतीने महाविद्यालय परिसरात दिनांक ३० सप्टेंबर २०२३ रोजी सकाळी ८.०० ते १०.०० वाजेपर्यंत दोन तास श्रमदान व स्वच्छता करुन महात्मा गांधीजी यांना अभिवादन करण्यात आले.




**आटपाडी : येथे श्रीमंत बाबासाहेब देशमुख महाविद्यालयाच्या वतीने महात्मा गांधीजींना स्वच्छतेतून अभिवादन करण्यात आले. याप्रसंगी उपस्थित एन.सी.सी. विभागाचे विद्यार्थी व मान्यवर**

यामध्ये महाविद्यालयातील एन.सी.सी. विभागातील जवळपास ४० कॅडेट सहभागी झाले होते. महाविद्यालयातील एनसीसी विभाग सातत्याने नवनवीन उपक्रम राबवून सामाजिक क्षेत्रामध्ये कार्यरत आहे. नगरपंचायत आटपाडी व महाविद्यालयातील एनसीसी विभागाच्या वतीने ही स्वच्छता व वृक्षारोपण मोहीम राबवण्यात आली होती. तसेच बनपुरी येथील शहीद जवान विष्णू पुकळे यांच्या स्मृतिदिनानिमित्त महाविद्यालयातील एनसीसी विभागाने बनपुरी येथे जाऊन सायलेंट ड्रिल तसेच वेगवेगळ्या उपक्रमांमध्ये सहभागी होवून अभिवादन केले होते.

एनसीसी विभागाचा सीनियर अंडर ऑफिसर अविनाश भोसले याची दिल्ली येथे होणाऱ्या आरडीसी परेडसाठीचे पहिले दोन कॅम्प पूर्ण केले असून सध्या तो तिसऱ्या कॅम्प साठी पात्र झाला आहे. संस्थेचे चेअरमन अमरसिंह देशमुख यांची सातत्याने प्रेरणा मिळत असते. तसेच एन.सी.सी. बटालियन सांगलीचे कमांडिंग ऑफिसर कर्नल अभिजीत बर्वे, सुभेदार मेजर हणमंत जाधव यांचे मार्गदर्शन लाभत असते. 'स्वच्छता ही सेवा' या कार्यक्रमाचे संयोजन महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.शिवाजीराव भोसले, डॉ. विजय लोंढे, एन.सी.सी, विभाग प्रमुख प्रा.विजय शिंदे, ओंकार बाबर, ज्युनिअर अंडर ऑफिसर शुभम देशमुख,ऑफिस सीनियर अमोल यादव, सार्जंट मिलींद वाघमारे, सार्जंट आरती लोहार, कार्पोरल अरमान मुलाणी,अश्विनी गायकवाड, विनायक मंडले आदींनी केले होते.

## चांदोली धरणातून विसर्ग वाढवला

**माणदेश एक्सप्रेस न्युज**

**शिराळा :** चांदोली धरणाच्या पाणलोट क्षेत्रात पावसाचा जोर वाढल्याने धरणाच्या वक्राकार दरवाजातून पाण्याचा विसर्ग वाढविण्यात आला असून चांदोली धरणातून रविवारी सायंकाळपासून ६ हजार ४०० क्युसेकचा विसर्ग करण्यात येत आहे. यामुळे नदीकाठच्या गावांना सतर्क राहण्याचा इशारा धरण व्यवस्थापनाने दिला आहे.

गेल्या दोन दिवसांपासून जिल्ह्यात पावसाची रिपरिप सुरू असून गेल्या २४ तासांत जिल्ह्यात सरासरी ९.७ मिलीमीटर पाऊस झाला आहे. मात्र, पश्चिम भागातील चांदोली धरण गेल्या आठवड्यातच काठोकाठ भरले असून धरणात क्षमतेइतके म्हणजे ३४.४० टीएमसी पाणीसाठा झाला आहे. धरणाच्या पाणलोट क्षेत्रात पावसाचा जोर शनिवारपासून वाढला असल्याने पाण्याची मोठी आवक होत आहे. यामुळे धरणाच्या वक्राकार धरणातून ५ हजार आणि पायथा विद्युतगृहातून १ हजार ४०० क्युसेकचा विसर्ग नदीपात्रात करण्यात येत आहे. यामुळे नदीतील पाण्याची पातळी वाढणार असल्याने नदीकाठच्या लोकांना सतर्क राहण्याचा इशारा धरण व्यवस्थापनाने दिला आहे.







दैनिक माणदेश एक्सप्रेस हे पत्रक श्री. शशिकांत बापूसाहेब कुंभोजकर यांनी प्रकाशक, मालक श्री. दीपक गौतम प्रक्षाळे यांच्यासाठी कुंभोजकर ऑफसेट प्रिंटर्स, २६२, महावीरनगर, सांगली. पीन ४१६४१६ महाराष्ट्र येथे छापून विठ्ठलनगर, आटपाडी, ता. आटपाडी, जि. सांगली पिन- ४१५३०१ महाराष्ट्र येथून प्रसिद्ध केले. या अंकात प्रसिद्ध होणाऱ्या बातम्या, लेख, जाहिराती इ. विषयी संपादक, मुद्रक, प्रकाशक, मालक सहमत असतीलच असे नाही. RNI Reg.No- MAHMAR/2017/77021 (आटपाडी न्यायकक्षेत)

संपूर्ण माणदेशात एकाचवेळी प्रसिध्द होणारे एकमेव दैनिक
mandeshexpressatp@gmail.com
दैनिक
माणदेशी बुलंद आवाज...
# माणदेश एक्सप्रेस






## यशस्वी जीवनासाठी ध्येय निश्चिती करा : प्रतीक इंदलकर

**माणदेश एक्सप्रेस न्युज**

**म्हसवड/प्रतिनिधी :** यशस्वी जीवनासाठी ध्येयनिश्चिती करणे महत्त्वाची असल्याचे प्रतिपादन केंद्रीय लोकसेवा आयोग परीक्षेतून भारतीय वन सेवेमध्ये निवड झालेले प्रतीक प्रकाश इंदलकर यांनी म्हसवड येथे व्यक्त केले.

क्रांतिवीर शैक्षणिक संकुल म्हसवड येथे केंद्रीय लोकसेवा आयोग संचलित भारतीय वनसेवेमध्ये प्रतीक प्रकाश इंदलकर यांची निवड झाल्याबद्दल यांचा सत्कार आयोजित केला होता.कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी संस्था अध्यक्ष कृषिरत्न प्रा. विश्वंभर बाबर होते.यावेळी राज्य महसूल उपसचिव प्रकाश इंदलकर, मुख्याध्यापिका राजकुमारी इंदलकर, संस्था सचिव मुख्याध्यापिका सुलोचना बाबर, राजेवाडी सरपंच प्रशांत



**म्हसवड : केंद्रीय लोकसेवा आयोगातून भारतीय वन सेवेमध्ये निवड झालेले प्रतीक इंदलकर यांचा सत्कार क्रांतिवीर शिक्षण संकुल येथे करण्यात आला. याप्रसंगी उपस्थित मान्यवर**

शिरकांडे, प्राचार्य विठ्ठल लवटे, प्रज्वल इंदलकर,इत्यादी मान्यवर उपस्थित होते.

यावेळी बोलताना प्रतीक इंदलकर म्हणाले, आज माझ्या आयुष्यातील एक सर्वोच्च आनंदाचा क्षण असून थोर क्रांतिवीराचे नाव असणाऱ्या क्रांतिवीर शैक्षणिक संकुलात माझा सन्मान होत आहे.मा झ्या यशामध्ये माझे आई-वडील,नातेवाईक व सर्व गुरुजनांचा महत्त्वाचा वाटा आहे.मी स्वतः अभ्यास केला मात्र मला प्रेरणा देण्याचे काम वरील सर्व मान्यवरांनी केले. आज होत असलेला सन्मान हा माझ्याबरोबरच माझ्या गुरुजन व आई-वडिलांचा सन्मान असल्याचे प्रतीक इंदलकर यांनी स्पष्ट केले.

विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना ते म्हणाले जीवनात शालेय स्तरापासूनच ध्येय निश्चिती करा. वेळ व अभ्यासाचे नियोजन करा.जिद्द चिकाटी ठेवा. अवांतर वाचन हा स्पर्धा परीक्षेतील अविभाज्य घटक आहे त्यासाठी वाचनाची आवड जोपासा. शरीर हीच खरी संपत्ती असूनअभ्यासाबरोबर व्यायाम व खेळाकडे लक्ष देण्याचे आवाहन प्रतीक इंदलकर यांनी केले.

यावेळी संस्था अध्यक्ष विश्वंभर बाबर, राज्य महसूल उपसचिव प्रकाश इंदलकर, मुख्याध्यापिका राजकुमारी इंदलकर, प्राचार्य विठ्ठल लवटे यांनी मनोगत व्यक्त केले. सूत्रसंचालन प्राध्यापिका वृषाली सावंत तर आभार प्रा. समाधान चव्हाण यांनी व्यक्त केले.

## एक तास स्वछता श्रमदान

**माणदेश एक्सप्रेस न्युज**

**माळशिरस/विष्णू भोंगळे :** स्वच्छता ही सेवा मोहिम अंतर्गत सदाशिवनगर ग्रामपंचायत व जे.एम. म्हात्रे कंपनी यांचे संयुक्त विद्यमाने सदाशिवनगर मध्ये 'एक तारीख एक तास' या मोहिमे खाली स्वच्छतेसाठी श्रमदान हा कार्यक्रम घेण्यात आला.



**सदाशिवनगर : येथे 'एक तारीख एक तास' या मोहिमे खाली स्वच्छतेसाठी श्रमदान करताना उपस्थित मान्यवर**

सदर उपक्रमांतर्गत ग्रामपंचायत कार्यक्षेत्रातील विविध सार्वजनिक ठिकाणी येथे स्वच्छतेचे कार्यक्रम करण्यात आले स्वच्छतेची शपथ घेण्यात आली कचरा संकलित करण्यात आला व विविध उपक्रम राबविण्यात आले.

स्वच्छता कार्यक्रमासाठी सदाशिवनगरचे सरपंच विरकुमार दोशी, उपसरपंच उदय धाईजे, ग्रामविकास अधिकारी प्रशांत रुपनवर, सदस्य तानाजी ओव्हाळ, लक्ष्मण मोहिते, गोरक्षनाथ पालवे, हुसेन मुलानी, विष्णू भोंगळे, किशोर देवकुळे, नंदु धाईजे पंचायत समितीचे विस्तार अधिकारी श्री. लोंढे, पाणी पुरवठा विभागाचे ज्युनिअर इंजिनिअर श्री. आम्ले, श्री. कृष्णा, जे.एम. म्हात्रे कंपनीचे सत्यानंद पाठक, जॉनी शर्मा, विनोद कौलकर, विश्वजित काकडे, श्री. सतिश, निलेश वाघमारे, मनोज इनामदार, विजय कापसे यांच्यासह सदशिवनगर ग्रामस्थ, ग्रामपंचायत कर्मचारी, जे.एम. म्हात्रे कंपनी यांनी स्वच्छता मोहिमे मध्ये मोठा सहभाग घेतला.

## कुलगुरुपदी डॉ. प्रकाश महानवर यांची निवड

**माणदेश एक्सप्रेस न्युज**

**सोलापूर :** पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठाच्या कुलगुरुपदी डॉ. प्रकाश अण्णा महानवर यांची नियुक्ती करण्यात आली आहे. राज्यपाल तथा राज्यातील सार्वजनिक विद्यापीठांचे कुलपती रमेश बैस यांनी डॉ. प्रकाश महानवर यांची नियुक्ती केली. डॉ. प्रकाश महानवर (जन्म १-६-१९६७) सध्या मुंबई विद्यापीठाच्या दूर व मुक्त अध्ययन संस्थेत वरिष्ठ प्राध्यापक व संचालक पदावर कार्यरत आहेत. डॉ. मृणालिनी फडणवीस, कुलगुरू, पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ, सोलापूर यांचा कार्यकाळ ५ मे २०२३ रोजी संपल्यामुळे सदर पद रिक्त झाले होते. त्यानंतर डॉ. होमी भाभा राज्य विद्यापीठाचे कुलगुरु डॉ. रजनीश कामत यांचेकडे सदर पदाचा अतिरिक्त कार्यभार देण्यात आला होता.



**डॉ. प्रकाश महानवर**

पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठाच्या कुलगुरुपदाच्या नियुक्तीसाठी राज्यपालांनी आयआयटी कानपूरचे माजी संचालक डॉ. संजय धांडे यांच्या अध्यक्षतेखाली कुलगुरु निवड समिती गठीत केली होती. विश्वेश्वरैय्या राष्ट्रीय तंत्रज्ञान संस्थेचे संचालक प्रमोद पडोळे, हैद्राबाद येथील इंग्रजी व परकीय भाषा विद्यापीठाचे कुलगुरु प्रा. ई. सुरेशकुमार (युजीसी प्रतिनिधी) व राज्य शासनाच्या उच्च व तंत्र शिक्षण विभागाचे प्रधान सचिव विकास चंद्र रस्तोगी हे समितीचे सदस्य होते. समितीने शिफारस केलेल्या उमेदवारांच्या मुलाखती घेतल्यानंतर राज्यपालांनी यांनी डॉ. प्रकाश महानवर यांची कुलगुरुपदी नियुक्ती जाहीर केली आहे.

## बारामती ग्रोवरील कारवाईला राजकीय स्वरुप नको : अजित पवार

**माणदेश एक्सप्रेस न्युज**

**पुणे :** आमदार रोहित पवार यांच्या बारामती ग्रो साखर कारखान्याला आलेल्या नोटीसीसंबधी उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी भूमिका स्पष्ट केली. कोणतीही कारवाई कधी कोणी जाणून बुजून करत नाही मागच्या वर्षी श्रीनिवास पवार यांच्या शरयू कारखान्याला देखील नोटीस आली होती. आमच्याही अनेक संस्थांना नोटीस आल्या आहेत. पंकजा मुंडे यांच्या कारखान्याला देखील नोटीस आली. नोटीस देणारी यंत्रणा त्यांचं ते काम करत असते. नोटीसीला उत्तर दिलं तर तो प्रश्न संपून जातो. या विषयाला राजकिय स्वरुप देवू नये अशी माझी विनंती असल्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार म्हणाले. बारामतीत ते पत्रकारांशी बोलत होते.



**अजित पवार**

पवार म्हणाले, राज्यात आम्ही तीन वेगवेगळे पक्ष एकत्र आलो आहोत. शनिवारी वर्षा बंगल्यावर मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस व मी अशी बैठक झाली. राज्यात वेगवेगळे प्रश्न असतात त्यामुळे आम्ही त्यावर एकत्र बसून चर्चा केली. कायदा आणि सुव्यवस्थेच्या दृष्टीने आम्ही चर्चा केली. गणपती झाले, ईद झाली आता छटपूजा आली त्यामुळे त्यावर चर्चा केली. कांदा प्रश्नावर ते म्हणाले, या प्रश्नी केंद्रीय वाणिज्य मंत्री पियुष गोयल यांच्यासोबत बैठक होती,परंतु नितीन गडकरी यांच्या अकोल्यातील कार्यक्रमाला ते यावेत अशी गडकरींची अपेक्षा होती,गोयल यांनी या प्रश्नी सकारात्मक मार्ग काढण्याचे आश्वासन दिले आहे.

मराठा आरक्षणासाठी मनोज जरांगे मेळावे घेत असल्याच्या प्रश्नावर पवार म्हणाले, कुणी, कुठे मेळावा घ्यायचा हा ज्याचा त्याचा अधिकार आहे, मुख्यमंत्र्यांनी स्वतः जाऊन त्यांचे उपोषण सोडले. काही धनगर बांधव चौंडीला उपोषणाला बसले होते गिरीश महाजन यांनी जाऊन तिथं उपोषण सोडले. देवेंद्र फडणवीस यांनी चंद्रपूरला होते तिथे गेले आणि ओबीसी यांचे उपोषण सोडले. हे प्रश्न सोडवण्याचा आमचा प्रयत्न आहे असे ते म्हणाले.

## उजनीतील पाणीसाठ्यात वाढ

**माणदेश एक्सप्रेस न्युज**

**सोलापूर :** पावसाने हुलकावणीच दिल्यामुळे सोलापूर जिल्ह्यात दुष्काळाचे सावट पसरले असताना जिल्ह्यासाठी वरदान ठरलेल्या उजनी धरणातही पाणीसाठा जेमतेम पाणीसाठा होता. परंतु धरणाच्या वरील भागात होणाऱ्या जोमदार पावसामुळे धरण वेगाने भरत आहे. त्यामुळे सोलापूरकर सुखावले आहेत.

मागील १५ दिवसांत उजनी धरणातील पाणीसाठा वधारत असून अवघ्या २० टक्क्यांच्या पुढे न वाढणारा धरणातील पाणीसाठा आता वेगाने वाढत ४० टक्क्यांच्या दिशेने वाटचाल करीत आहे. रविवारी सायंकाळी धरणात एकूण पाणीसाठा ८४.२३ टीएमसी तर उपयुक्त पाणीसाठा २०.५१ पर्यंत वाढला होता. गेल्या तीन दिवसांत पाणीसाठा झपाट्याने वाढला असून येत्या दोन दिवसांत उपयुक्त पाणीसाठा ५० टक्के सर करण्याची आशा निर्माण झाली आहे.

उजनी धरणाची एकूण क्षमता १२३ टीएमसी एवढी आहे. धरण शंभर टक्के भरण्यासाठी आणखी ४० टीएमसी पाणीसाठ्याची गरज आहे. प्राप्त परिस्थितीत धरणातील वाढलेला पाणीसाठा पाहता धरणातून शेतीसाठी पाण्याचे आवर्तन सोडण्याचा मार्ग मोकळा झाला आहे. रविवारी दुपारी उजनी धरणात दौंडमार्गे येणारा पाण्याचा विसर्ग २५ हजार ८५९ क्युसेक इतका होता. त्यात सायंकाळी नऊ हजार क्युसेकने वाढ होऊन ३४ हजार १५८ क्युसेक विसर्गाने पाणी धरणात मिसळत होते. पुण्यातील बंडगार्डन येथून नदीत येणाऱ्या पाण्याचा विसर्ग वाढून १६ हजार १२३ क्युसेकपर्यंत गेल्यामुळे उद्या सोमवारी धरणात मिसळणारे पाणी सुमारे ४० हजार क्युसेकपर्यंत वाढण्याची अपेक्षा आहे.















# अविनाश साबळेची सुवर्ण पदकाला गवसणी

**माणदेश एक्सप्रेस न्युज**
**मुंबई :** भारताचा धावपटू अविनाश साबळे याने हाँगझोऊ एशियन गेम्समध्ये काल रविवारीइतिहास रचला आहे. त्याने या स्पर्धेत सुवर्णपदकाला गवसणी घातली. याचबरोबर भारताच्या खात्यात १२ व्या सुवर्णपदकाची भर पडली आहे.
३००० मीटर स्टीपलचेसमध्ये भारतासाठी हे पहिले सुवर्णपदक आहे. आशियाई क्रीडा स्पर्धा १९५१ मध्ये सुरू झाल्या आणि तेव्हापासून ३००० मीटर स्टीपलचेस (पुरुष) स्पर्धा सुरू झाल्या, परंतु भारताच्या एकाही खेळाडूने त्यात सुवर्णपदक जिंकले नव्हते. अविनाश साबळेने हा दुष्काळ संपुष्टात आणला. आशियाई क्रीडा स्पर्धेत भारताचे हे अ‍ॅथलेटिक्समधील चौथे पदक आहे. याआधी किरण बालियानने महिलांच्या शॉटपुटमध्ये कांस्य, कार्तिक कुमारने पुरुषांच्या १० हजार मीटर शर्यतीत रौप्य आणि गुलवीर सिंगने कांस्यपदक जिंकले होते.
राष्ट्रकुल स्पर्धेतील रौप्यपदक विजेता भारताचा ३००० मीटर स्टीपलचेस धावपटू अविनाश साबळे वर्ल्ड चॅम्पियनशीपमधील निराशाजनक कामगिरी केली होती. पण ती कामगिरी




विसरुन तो हाँगझोऊ एशियन गेम्समध्ये उतरला. त्याने राष्ट्रीय विक्रमासह सुवर्ण पदक मिळवण्याचा निर्धार व्यक्त केला होता.
महाराष्ट्रातील बीड जिल्ह्यातून आलेला साबळेने गेल्या महिन्यात हंगेरीची राजधानी बुडापेस्ट येथे झालेल्या वर्ल्ड अ‍ॅथलेटिक्स स्पर्धेत ३००० मीटर स्टीपलचेस स्पर्धेत पहिल्या हिटमध्येच सातव्या स्थानावरुन बाहेर पडला होता. त्यामुळे त्याला अंतिम फेरीत धावता आले नाही. पण ते अपयश मागे टाकून त्याने आशियाई स्पर्धेत सर्वश्रेष्ठ कामगिरी नोंदवली आणि सुवर्णपदक मिळवून दाखवले. वर्ल्ड चॅम्पियनशीपमध्ये माझ्याकडून चुका झाल्या होत्या. त्याच्यानंतर पुन्हा आत्मविश्वास मिळवणे थोडे कठिण गेले. पण आशिया क्रीडा स्पर्धेत सुवर्णपदक मिळवणारच असा मी निर्धार केला होता. त्यासाठी खूप प्रयत्न केले. अखेर त्यात यश आले आहे, अशी भावना साबळेने व्यक्त केली.

# कर्मवीरांनी शिक्षण गरीबांच्या झोपडीपर्यंत पोहचवले : देशमुख

**माणदेश एक्सप्रेस न्युज**
**म्हसवड/प्रतिनिधी :** रयत शिक्षण संस्था ही खऱ्या अर्थाने गोरगरीब विद्यार्थ्यांसाठी कर्मवीर आण्णांनी निर्माण करून ज्ञानाची गंगा गरीबांच्या झोपडीपर्यंत पोहोचवली, असे मत माजी सनदी अधिकारी प्रभाकर देशमुख यांनी व्यक्त केले. ते रयत शिक्षण संस्थेचे संस्थापक पद्मभूषण डॉ.कर्मवीर भाऊराव पाटील यांचा १३६ वा जयंती सोहळा निमित्त देवापूर येथील कर्मवीर भाऊराव पाटील कृषी विद्यालय व ज्युनिअर कॉलेज ऑफ सायन्स व ठक्कर बाप्पा वसतिगृह येथे झालेल्या कार्यक्रमात बोलत होलते.




म्हसवड : कर्मवीर भाऊराव पाटील कृषी विद्यालय व ज्युनिअर कॉलेज ऑफ सायन्स येथे कर्मवीर यांच्या जयंतीनिमित्त प्रभाकर देशमुख यांचा सत्कार क्रताताना उपस्थित मान्यवर

यावेळी कार्यक्रमास प्रमुख पाहुणे म्हणून रयत शिक्षण संस्थेचे आजीव सदस्य प्राचार्य बी.एस. खाडे, प्रमुख वक्ते दादाराम साळुंखे, प्राचार्य टी. एस. माने, पर्यवेक्षक डि. एल. चिंचकर, सरपंच शहाजी बाबर, डॉ. विकास बाबर, प्रा.विश्वंभर बाबर, रावसाहेब बाबर, उध्दव बाबर, राजाराम बाबर, किरण बाबर उपस्थित होते.
पुढे बोलताना देशमुख म्हणाले, जगातील शिक्षण व्यवस्थेतील बदलाला आपली शिक्षण व्यवस्था टिकण्यासाठी कार्यक्षम बनवली पाहिजे. तसेच कर्मवीर अण्णांचे रयतेचे संस्कार विद्यार्थ्यांना शिकवावेत कर्मवीर अण्णांचे विचार शेवटच्या विद्यार्थ्यांना शिकवणे गरजेचे आहे मुलांचे शिक्षण हिच खरी गुंतवणुक आहे मुलांसाठी पालकांनी वेळ दिला पाहिजे. विद्यार्थ्यांनी कष्ट करण्याची तयारी ठेवा जगात अशक्य अशी कोणतीही गोष्ट नाही असेही शेवटी सांगितले.
कार्यक्रमाच्या सुरुवातीला विद्यार्थी मनोगत, गुणवंत विद्यार्थ्यांना बक्षिस वितरण व सत्कार करण्यात आला. कार्यक्रमाला शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी, पालक, विद्यार्थी विद्यार्थिनी मोठ्या संख्येने उपस्थित होते तर उपस्थिताचे आभार प्रा. बी. एन. पाटील यांनी मानले.

# पाण्याच्या डबक्यांमुळे डासांचा उच्छाद

## नागरिकांचे आरोग्य धोक्यात : नातेपुते नगरपंचायतीचे आरोग्याकडे दुर्लक्ष?

**माणदेश एक्सप्रेस न्युज**
**नातेपुते/राजेंद्र पिसे :** नातेपुते येथील रहिवासी भागांसह विविध भागातील रस्त्यांवरील खड्ड्यांमध्ये पावसाचे पाणी साचून डबके तयार झाले आहेत. शिवाय पाण्याने बऱ्याच ठिकाणी कचरा कुजल्याने डासांची पैदास वाढली आहे. त्यामुळे आरोग्याच्या समस्या निर्माण होत असून नागरिकांच्या आरोग्याच्या प्रश्नाकडे नगरपंचायतीचे दुर्लक्ष झाले असून याकडे नगरपंचायतीने लक्ष देवून विविध उपाययोजना करण्याची गरज असल्याच्या प्रतिक्रिया नागरिक देत आहेत.
रहिवाशी भागात नगरपंचायतीने औषध आणि धूर फवारणी करण्याची गरज आहे. गेल्या काही दिवसापासून शहरात सतत सुरू असलेल्या पावसाने रस्त्यांची चाळण झाली आहे. ठिकठिकाणी खड्ड्यांचे साम्राज्य दिसत आहे. यात पावसाचे मोठ्या प्रमाणावर पाणी साचून डबके तयार झाले आहेत. हे डबके आरोग्याच्या समस्या निर्माण होण्यासाठी निमंत्रण देत आहे.



साचलेले पाणी आणि विविध ठिकाणी पडून असलेला कचरा यावर पावसाचे पाणी पडून कचरा कुजला आहे. असे दोन्ही ठिकाण डास उत्पत्तीचे केंद्र ठरत आहे.
डासांमुळे नागरिक आजारी पडण्याचे प्रमाण वाढत आहे. त्यामुळे शहरातील प्रत्येक लहान-मोठे दवाखाने यामध्ये रुग्णांची संख्या वाढत आहे. इतकेच नाही तर कुजलेल्या कचऱ्यामुळे डासांचे प्रमाण तर वाढलेच आहे. शिवाय परिसरात दुर्गंधी पसरली आहे. रहिवाशांना यामुळे आरोग्याचा त्रास जाणवत आहे. डासांपासून बचावासाठी पावसाळी वातावरणातही नागरिकांना पंखा लावण्याची वेळ आली आहे. काहींनी मच्छरदाणीचा वापर सुरू केला आहे. यापुढे आणखी भयावह परिस्थिती निर्माण होऊ नये यासाठी नातेपुते नगरपंचायतीने औषध फवारणी करावी आशी मागणी नागरिकांकडून होत आहे.




# दीक्षा मोरे चे शालेय बॉक्सिंग स्पर्धेत यश

**माणदेश एक्सप्रेस न्युज**
**कोळे/वार्ताहर :** मोडनिंब ता. माढा या ठिकाणी पार पडलेल्या जिल्हास्तरीय शालेय बॉक्सिंग क्रीडा स्पर्धा पार पडल्या. या स्पर्धेत कोळा विद्यामंदिर हायस्कूल व ज्युनिअर कॉलेज कोळा या प्रशालेच्या विद्यार्थ्यांनी घवघवीत यश संपादन केले असून कु. दीक्षा नंदकुमार मोरे हिने ६५ किलो वजनी गटात प्रथम क्रमांक मिळवला असून विभागीय स्पर्धेसाठी तिची निवड झाली असल्याचे प्रशालेच्या वतीने सांगण्यात आले आहे.




कोळे : शालेय बॉक्सिंग स्पर्धेत यश मिळविलेली कु. दीक्षा मोरे हिची विभागीय स्पर्धेसाठी निवड झाली आहे.

या स्पर्धेत प्रशालेच्या विद्यार्थिनी कु.सोनाली सरगर हिने ५० किलो वजनी गटात द्वितीय क्रमांक, कु.प्रणाली मोरे हिने ५५ किलो वजनी गटात द्वितीय क्रमांक, कु.कोमल बिले हिने ५८ किलो वजनी गटात द्वितीय क्रमांक तर कु.संजना हातेकर ६१ किलो वजनी गटात द्वितीय क्रमांक मिळवला.
स्पर्धेसाठी सदर खेळाडूना क्रीडा शिक्षक महादेव नरळे, सुनील माळी यांचे मार्गदर्शन लाभले.
वरील विद्यार्थ्यांचे सांगोला तालुका शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष प्रा.पी.सी.झपके, सचिव म.श.घोंगडे, सहसचिव प्रशुद्धचंद्र झपके, खजिनदार शंकरराव सावंत, कार्यकारणी सदस्य विश्वेश्वर झपके आणि सर्व संस्था कार्यकारणी सदस्य, मुख्याध्यापक श्रीकांत लांडगे, पर्यवेक्षक रफिक मणेरी व सर्व शिक्षक शिक्षकेत्तर कर्मचारी व कोळा ग्रामस्थ यांनी अभिनंदन केले व पुढील विभागीय स्पर्धेसाठी शुभेच्छा दिल्या.

# रंजल्या गांजलेल्यांना केलेली मदत हिच खरी भक्ती होय

## अभिजीत जगताप : गणेशोत्सवाच्या वर्गणीतून आश्रमातील निराधारांना मिष्ठान्न वाटप

**माणदेश एक्सप्रेस न्युज**
**म्हसवड/अहमद मुल्ला :** भारतीय संस्कृतीत अन्नदानाचे महत्त्व अनन्यसाधारण असून, भुकेलेल्यांला अन्न, तहानलेल्यांना पाणी आणि रंजल्या गांजलेल्यांना मदत करणे यामध्येच खऱ्या अर्थाने भक्तीभाव दडला आहे. गाडगेबाबांनी जपलेला हा मुलमंत्र अखंड मानव जातीच्या कल्याणाचा मुळमार्ग असल्याचे मत प्राथमिक शिक्षक सहकारी बँकेचे सातारा येथील सेवक गणेशोत्सव मंडळाचे अध्यक्ष अभिजित जगताप यांनी व्यक्त केले.
पानवण ता. माण येथील निराधार निराश्रित विद्यार्थ्यांच्या श्री.गजानन आश्रमात, प्राथमिक शिक्षक सहकारी बँक सातारा येथील सेवक गणेशोत्सव मंडळाकडून राबविण्यात आलेल्या अन्नदान या उपक्रमांतर्गत आयोजित केलेल्या सामुदायिक मिष्ठान्न




म्हसवड : पानवण येथील अनाथ आश्रमात शिक्षक बँकेतील सेवक यांच्याकडून अन्नदान करण्यात आले. याप्रसंगी उपस्थित

भोजनसमयी ते बोलत होते. याप्रसंगी आश्रमच्या संचालिका रमाताई तोरणे, जिल्हा शिक्षक बँकेचे उपाध्यक्ष विजय बनसोडे, स्वप्नील बोराटे,अमित जाधव, शुभम शिंगटे, सूर्यकांत गवरे, सोमनाथ कदम, काशिनाथ तोरणे, कासलिंग दोलताडे, आनंदा जमाले, अनिल काळेल, सुंदरराव पैठणे, सुरेश खांडेकर, पिंटू पोरे, उमाकांत तोरणे, पवन तोरणे, महेश तोरणे आदी मान्यवर व ग्रामस्थ उपस्थित होते.
गणेशोत्सवाच्या निमित्ताने डॉल्बी डीजेतील मिरवणूका, ढोल ताश्यांचा कडकडाट, पर्यावरणास हानिकारक असलेली फटाक्यांची आतषबाजी यासह इतरत्र होणाऱ्या अतिरिक्त खर्चाला फाटा देऊन सेवक गणेशोत्सव मंडळातील सर्व सभासद, ठेवीदार व सेवक वर्गांनी यंदा भुकेलेल्यांना अन्नदान, गरजूंना मदत, महिलांच्या करमणुकीसाठी खेळ पैठणीचा, तसेच हसण्यासाठी जीवन आपले आदी समाजोपयोगी कार्यक्रमावर भर दिल्याने, जिल्ह्यातील इतर गणेशोत्सव मंडळांसाठी ही एक प्रेरणादायी बाब ठरली आहे.
पानवण येथील निराधार निराश्रित मुलांना आपुलकीने मिष्ठान्न भोजन दिल्याने, चिमुकल्यांमध्ये आनंदाचे आणि समाधानाचे वातावरण निर्माण झाले होते.यावेळी आश्रमच्या संचालिका रमाताई तोरणे यांनी आश्रमातील आवश्यक असलेल्या सोलर दुरुस्तीसह इतर बाबींचा लेखाजोखा उपस्थित मान्यवरांच्या समोर मांडला. यावेळी म्हसवड बिट परिसरातील शिक्षक वर्गासह ग्रामस्थ उपस्थित होते.




